# प्रेसनोट

दि. २३/१०/२०२४

**अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून महावितरणच्या बंडगार्डन विभाग, पुणे येथील कार्यकारी अभियंता यास लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३९ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. भाऊसाहेब मच्छिंद्र सावंत, वय ५१ वर्ष, पद – कार्यकारी अभियंता, महावितरण, बंडगार्डन विभाग, पुणे (वर्ग-१) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०७/१०/२०२४, ०८/१०/२०२४, २१/१०/२०२४ व दि. २२/१०/२०२४ |
| सापळा दिनांक | दि. २३/१०/२०२४ रोजी |
| ठिकाण | महावितरण कार्यालय, बंडगार्डन विभाग, पुणे १. |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे शासन मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदार आहेत. त्यांनी त्यांचे ओळखीचे व्यावसायिकांच्या ५ नविन इमारतीसाठी इलेक्ट्रिक डीपी उभारुन सप्लाय चालू करुन देण्याचे काम घेतले होते. त्यासाठी त्यांनी ५ फाईल तयार करुन मंजुरीसाठी लोकसेवक भाऊसाहेब सावंत यांच्या महावितरण कार्यालय, बंडगार्डन विभाग, पुणे येथे दिलेल्या होत्या. तसेच तक्रारदार यांनी मांजरी येथील एका नवीन इमारतीच्या ठिकाणी उभारलेल्या डीपी वर लोकसेवक भाऊसाहेब सावंत यांचेकडून वीज भार मंजूर करुन घेवून सप्लाय चालु करुन दिला आहे.

लोकसेवक भाऊसाहेत सावंत यांच्याकडे तक्रारदार यांच्या वरील प्रमाणे प्रलंबित असलेल्या ५ फाईलवर कार्यवाही करण्यासाठी आणि तक्रारदाराने मांजरी येथील नविन इमारतीसाठी उभारलेल्या डीपीवर वीज भार मंजूर केल्याचा मोबदला म्हणून लोकसेवक भाऊसाहेब सावंत यांनी तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक भाऊसाहेब सावंत यांनी तक्रारदाराच्या वरील प्रमाणे प्रलंबित असलेल्या ५ फाईलवर कार्यवाही करण्यासाठी व तक्रारदाराने मांजरी येथील नविन इमारतीसाठी उभारलेल्या डीपीवर वीज भार मंजूर केल्याचा मोबदला म्हणून ५,००,०००/- (पाच लाख) रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होवून, आज दि. २३/१०/२०२४ रोजी तक्रारदाराकडे एकुण मागितलेल्या लाच रक्कमेपैकी अॅडव्हान्स म्हणून २,००,०००/- (दोन लाख) रुपये लाच रक्कम लोकसेवक भाऊसाहेब सावंत यांनी तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारले असता त्याना ताब्यात घेण्यात आलेले असून, त्यांचेविरुद्ध वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

23/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.